**धुळे महानगरपालिका**

**१५ व्या वित्त आयोग अंतर्गत रिक्त पद भरतीसाठी सविस्तर जाहिरात**

धुळे महानगरपालिका धुळे १५ व्या वित्त आयोग अंतर्गत खालील पदे मानधनावर कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी अर्हताधारक उमेदवारांच्या थेट मुलाखतीद्वारे निवड करण्याच्या मार्गदर्शक सुचना आहेत तसेच रिक्त पदांची जाहिरात https://jobrecruitment.dhulecorporation.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

सर्व सूचनांचे काळजीपुर्वक अवलोकन करुन अर्ज विहीत केलेल्या पध्दतीनुसार ऑनलाईन सादर करावा. अर्जामध्ये दिलेली माहिती व कागदपत्रे यांच्या आधारे उमेदवारांची पात्रता / अपात्रता तपासण्यात येईल व त्या आधारे त्यांचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल तथापि अर्ज स्विकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवार त्या कंत्राटी पदाकरीता पात्र आहे असा अर्थ होणार नाही. निवड प्रक्रिये दरम्यान कोणत्याही वेळी किंवा निवडीनंतर अर्जदार विहीत अर्हता धारण करीत नसल्याचे किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी व निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करतांना अर्जा सोबत कागदपत्रांच्या प्रती ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच मुलाखतीच्या दिवशी कागदपत्रे पडताळणीसाठी मुळ कागदपत्रांसह व अर्जाच्या प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक राहील. पदांकरीता शासन मार्गदर्शक सुचनेनुसार अनुभव व उच्च शैक्षणिक अर्हतेनुसार अर्ज छाननी करुन पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल.

**ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी :**

दि. २८ / ०५ / २०२६ ते दि. ०५ / ०६ / २०२६ रोजी

**ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे संकेतस्थळ :** https://jobrecruitment.dhulecorporation.in/

**महानगरपालिका संकेतस्थळावर मुलाखतीस पात्र अर्जदारांची यादी घोषित करण्याचा दिनांक १० / ०६ /२०२६**

**थेट मुलाखत घेणेकरीताचा तपशील** - थेट मुलाखती करीता दिनांक १५ / ०६ /२०२६ रोजी उमेदवारांनी ऑनलाईन सादर केलेला अर्ज, कागदपत्रांच्या मुळ व छायांकित प्रतसह सकाळी ११.०० वा या वेळेत अटल बिहारी वाजपेयी सभागृह, नविन प्रशासकीय इमारत, धुळे महानगरपालिका ठिकाणी उपस्थित राहावे.

| अ क्र | पदाचे नाव | एकुण पदे | शैक्षणीक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित माधन | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Micro-biologist | १ | MBBS with MD Microbiology from Institute recognized by Medical Council of India | १८ ते ३८ वर्ष | रु.७५०००/- | OPEN |
| २ | वैदयकीय अधिकारी अर्धवेळ | ५ | MBBS From Institute Recognized by Medical Council of India | १८ ते ७० वर्ष | रु.३००००/- | सदर पदास आरक्षण लागू नाही. |
| ३ | वैदयकीय अधिकारी पूर्णवेळ | ६ | MBBS From Institute Recognized by Medical Council of India | १८ ते ७० वर्ष | रु.६००००/- | ST-४<br>NT C -१<br>OPEN -१ |

## अटी व शर्ती

**शैक्षणिक / तांत्रिक / व्यावसायिक अभ्यासक्रम माहिती तपशील -**

१. अर्जदाराने सर्व शैक्षणिक / तांत्रिक / व्यावसायिक अभ्यासक्रम इ. माहिती अर्जासोबत ऑनलाईन सादर करावी

२. शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचुक तपशील अर्जात नोंद करावा

३. अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेस उमेदवाराकडे पदाकरीता आवश्यक किमान शैक्षणिक पात्रता धारण केलेली असणे आवश्यक आहे

४. आवश्यक शैक्षणिक अर्हता ज्या तारखेस प्राप्त केली आहे ती तारीख अर्जात नमुद करणे आवश्यक आहे (निकाल घोषित केल्याचा दिनांक व वर्ष)

५. अंतिम वर्षाच्या प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडुन त्याचे गुणांमध्ये रुपातर करुन ते प्रमाणित करुन घ्यावे व त्याची प्रत अर्जासोबत जोडावी त्यानुसार अर्जात गुणांची टक्केवारी नमुद करावी व आपण निवडीस व मुलाखतीस पात्र ठरल्यास छाननी दरम्यान मुळ प्रत सादर करावी.

६. शैक्षणिक प्रमाणपत्रात नमुद गुणांची टक्केवारी व अर्जात नमुद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजुर करण्यात येतील.

७. अर्जात नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे / कागदपत्रे अर्जासोबत सादर करावी व आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान मुळ कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहील निवड प्रक्रियेच्या छाननी दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिका व अर्जामध्ये नमुद केलेली माहिती न जुळल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही कंत्राटी पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता / पात्रता ही विद्यापीठ अनुदान आयोग (UGC Approved) मान्यताप्राप्त विद्यापिठातुन प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे अशाच विद्यापीठातुन घेतलेली शैक्षणिक अर्हता / पात्रता ग्राह्य धरण्यात येईल

८. ज्या वैद्यकिय / निमवैद्यकिय पदाकरीता संबंधित वैद्यकिय / निमवैद्यकिय परिषदेची नोंदणी अनिवार्य आहे अशा अर्जदारानी संबंधित परिषदेकडे नोंदणी केलेली प्रमाणपत्र अर्जासोबत सादर अपलोड करावे व आपण निवडीस व मुलाखतीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान सादर करणे आवश्यक आहे

**अनुभवाचा तपशील अर्जदाराने सर्व अनुभवांचा तपशील अर्जासोबत नोंदवावा**

१. अर्ज करीत असलेल्या कंत्राटी पदाकरीता विहित केलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचाच अनुभव ग्राह्य धरण्यात येईल त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्या अनुभवाची दखल घेतली जाणार नाही.

२. अर्जामध्ये अनुभवाचा तपशील नमुद करताना सध्याच्या नियुक्ती कालावधी ते पहिली नियुक्ती कालावधी या क्रमानेच नमुद करावे.

३. अनुभवाचा तपशील नमुद करीत असताना ज्या कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे, अशाच कार्यालयाचा तपशील अर्जामध्ये नमुद करावा अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येणार नाही अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमुद असावा.

४. अनुभवाचा तपशील नमुद करताना रुजु दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचुकपणे नमुद करावा दोन्ही तारखा अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी यामध्ये तफावत आढळ्यात अशा अनुभवाचा विचार करण्यात येणार नाही. अनुभवास दाखला हा संबंधित संस्थेच्या लेटर हेड, अधिकृत अनुभव प्रमाणपत्र हे जावक क्रमांक, संस्थेचा अधिकृत सही व शिक्यानिशी असावे.

५. ज्या कंत्राटी पदाकरीता अर्ज केला आहे, त्या पदाशी संबंधित असलेला अनुभवच ग्राहय धरण्यात येईल या व्यक्तिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुमय विधारात घेतला जाणार नाही.

**कोणत्या पदांसाठी अर्ज करावयाचा आहे?**

अर्जदार एकापेक्षा जास्त पदांना अर्ज करु शकेल परंतु प्रत्येक पदाकरीता अर्जदारास स्वतंत्र अर्ज करणे बंधनकारक राहील, प्रत्येक अर्जासोबत आवश्यक सर्व कागदपत्रे /प्रमाणपत्रे जोडणे बंधनकारक राहिल, तसेच स्वंतत्र अर्ज शुल्क भरावे लागेल व सदरील अर्ज शुल्क नियमाप्रमाणे अर्जासोबत भरणे बंधनकारक राहील. एकाच अर्जात विविध कार्यक्रम / पद नमुद केल्यास तो अर्ज अपात्र ठरविण्यात येईल

**अर्ज शुल्क**

१. अर्जदाराने निवडलेल्या पदाच्या प्रमाणात शुल्काचा भरणा ऑनलाईन करावा
२. उमेदवारास रक्कम रु.१०००/- मात्र अर्ज शुल्क राहील
३. वैध शुल्क भरणा केल्याशिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारत घेतले जाणार नाही
४. अर्ज शुल्क ना परतावा (Non-Refundable) आहे.

**अर्ज भरण्याबाबतच्या इतर सर्व साधारण सुचना :-**

१. वरील सर्व पदे ही कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन त्यांचा कालावधी हा दिनांक २९/०६/२०२६ राहील पुढील ११ महिन्याकीरता पुर्ननियुक्ती देण्यात येईल शासनाच्या वयोमर्यादेच्या निकषानुसार वरिल पदांकरीता अटी लागू राहतील.

२. वरील सर्व पदे ही कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनावरिल असल्याने सदर याकरीता शासकीय सेवेनुसार असलेले नियम, अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही. त्याचसोबत यावरिल सर्व पदाकरीता शासनाकडील सेवा नियम लागु होत नाहीत.

३. सर्व पदांकरीता उमेदवारांनी थेट मुलाखतीत येतांना शैक्षणिक अर्हता पुर्ण केलेले सर्व कागदपत्र मुळ स्वरुपात व छायांकीत स्वरुपात घेवुन येणे बंधनकारक राहील.

४. सदर रिक्त पदांची संख्या, शैक्षणिक अर्हता, मानधन, वयोमर्यादा, सामाजिक आरक्षण, नियुक्त ठिकाणामध्ये बदल, नमुद केलेल्या अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन पदभरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही क्षणी बदल करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त तथा अध्यक्ष कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

५. राखीव प्रवर्गातुन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी अर्जासोबत जात प्रमाण पत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवार अपात्र ठरविण्यात येतील.

६. वैद्यकीय परिषदेकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणतेही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी तथापी वैध प्रमाणपत्र नसलेला उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

७. उमेदवार हा संबधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा तसेच उमेदवारांविरूध्द कोणत्याही स्वरूपाचा गुन्हा झालेला नसावा.

८. केंद्र सरकार अथवा राज्य शासनाकडून संबंधित पद नामंजूर केल्यास उमेदवारांस कोणतीही पूर्वसूचना न देता संबंधित उमेदवारांची सेवा तत्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

९. वयाचा पुरावा म्हणुन उमेदवारांने शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला, माध्यनिक शालांत प्रमाणपत्र (सनद) सादर करायी अथवा ज्यावरून उमेदवारांची जन्मतारीख ग्राहय धरणे सोईस्कर होईल अशा पध्दतीने प्रमाणपत्र सादर करावे.

१०. अर्ज करीता असणारी अर्जदार विवाहीत असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र, कागदपत्र यांची छायांकित प्रत अर्जासोबत सादर करावी व आपण निवडीस, मुलाखतीस पात्र झाल्यास पडताळणी दरम्यान मुळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे

**लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र**

१. शासनाच्या धोरणानुसार उमेदरवारास लहान कुटुंब धोरणाचे पालन करणे आवश्यक राहील.

२. तसेच अर्जासोबत सदर लहान कुटुंब छायांकित प्रमाणपत्र सादर करावे व उमेदवारांने आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान लहान कुंटुंब असल्याबाबतचे मुळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे

३. सदर लहान कुटुंबाचे प्रमाणपत्राचा संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**निवड प्रक्रिया -**

१. सदर कंत्राटी पदभरतीच्या अनुषंगाने निवड प्रक्रिया ठरविण्याचे सर्व अधिकार आयुक्त धुळे महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहेत.

२. सामाजिक आरक्षणाप्रमाणे निवडीस प्राधान्य देण्यात येईल आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास खुला प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवाराची निवड करण्यात येईल.

३. वैद्यकीय अधिकारी (पूर्णवेळ) या पदासाठी मुलाखतीच्या दिवशी एम.बी.बी.एस. अर्हताधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास बी.ए.एम.एस. अर्हताधारक उमेदवारांना कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती देण्याचे अधिकार समितीस राहीतील. परंतु बी.ए.एम.एस. अर्हताधारक यांना रु.२५,०००/- आणि रु.१५,०००/- PBI (Performance Base incentives) असे एकूण रु.४००००/- प्रति महिना मानधन राहील.

उपरोक्त निवड प्रकिये संदर्भात आयुक्त, धुळे महानगरपालिका यांना भरती प्रक्रियेमध्ये बदल करण्याचे अधिकार आहेत.

**इतर आवश्यक सुचना**

१. वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन त्यांचा कालावधी हा दिनांक २९/०६/२०२६ राहील पुढील ११ महिन्याकीरता पुर्ननियुक्ती देण्यात येईल.

२. केंद्र / राज्य शासनाने संबंधित पदे नामंजुर केल्यात उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल

३. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळाण्याची मागणी करता येणार नाही

४. निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉड पेपरवर करारनामा पदावर रुजु होताना सादर करावा लागेल.

५. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन ७ दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणुन प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येईल

६. निवड यादीतील गुणांक्रमाकांच्या आधारे प्राधान्यक्रमाणे पदस्थापना दिली जाईल त्याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवारांची उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

७. सदर कंत्राटी पदभरती प्रक्रियेबाबतची सुचना व माहिती महानगरपालिकेल्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल याबाबत उमेदवारांनी प्रत्यक्ष येवुन किंवा कार्यालयातील कोणत्याही कर्मचारी यांना संपर्क करु नये.

**करुणा डहाळे**
**अतिरिक्त आयुक्त**
**धुळे महानगरपालिका**

जा.क्र./धुमपा/आस्था/ 239
दिनांक 26 / 5 /२०२६